22 AUG 2017

पुढारी

# अर्थमंत्री मुनगंटीवार यांची डॉ. जाधव यांच्याशी 'जीएसटी'सह विविध विषयांवर सविस्तर चर्चा

## कोल्हापूरच्या विकासासाठी शासन पाठीशी : मुनगंटीवार यांची ग्वाही

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्याचे अर्थ व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सोमवारी दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. 'जीएसटी', शिवाजी विद्यापीठाला निधी देण्यासह राज्यातील विविध विषयांवर मुनगंटीवार यांनी डॉ. जाधव यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

डॉ. प्रतापसिंह जाधव यांच्या निवासस्थानी अर्थमंत्री मुनगंटीवार यांनी सोमवारी रात्री स्नेहभोजन घेतले. यावेळी शाहू महाराज, महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील, दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, पोलिस अधीक्षक संजय मोहिते उपस्थित होते.

**विद्यापीठाला लवकरच उर्वरित निधी**

सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाला राज्य शासनाने ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यापैकी केवळ तीन कोटी रुपयेच विद्यापीठाला प्राप्त झाल्याचे डॉ. जाधव यांनी अर्थमंत्री मुनगंटीवार यांच्या निदर्शनास आणून दिले. उर्वरित निधी लवकर उपलब्ध करून द्यावा, अशी विनंती डॉ. जाधव यांनी केली. त्यावर उर्वरित निधीबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे प्रस्ताव सादर करा, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्याकडे विद्यापीठाने पाठपुरावा करावा, अशी सूचना करत विद्यापीठाला उर्वरित निधी उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही मुनगंटीवार यांनी डॉ. जाधव यांना दिली.

**वन खात्याच्या प्रश्नांवर चर्चा**

मुंबई विद्यापीठाच्या कामकाजाबाबतही मुनगंटीवार यांनी चर्चा केली. मुंबई विद्यापीठाच्या निकालाबाबत नेमक्या परिस्थितीचीही माहिती घेत यावेळी चर्चा झाली. वन खाते म्हणजे वनवास असा लोकांचा समज आहे. मात्र, हे खाते किती महत्त्वाचे आहे, याद्वारे किती चांगल्या प्रकारे काम करता येते, याविषयी मुनगंटीवार यांनी सांगितले. राज्यासह जिल्ह्यातील वन विभागाशी संबंधित प्रश्नांवरही डॉ. जाधव यांच्याशी मुनगंटीवार यांनी चर्चा केली.

**'जीएसटी'मुळे विकासाला चालना**

दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांनी 'जीएसटी'बाबत विचारणा केली. त्यावर मुनगंटीवार म्हणाले, 'जीएसटी'मुळे राज्य शासनाला निधी उपलब्ध होणार आहे. या निधीमुळे विकासकामांची गती वाढणार आहे. 'जीएसटी'तून दर दोन महिन्याला निधी उपलब्ध होईल, असे सांगत मुनगंटीवार यांनी 'जीएसटी'चे राज्याच्या विकासात किती महत्त्वाचे योगदान राहील, याची माहिती दिली.

**औद्योगिक क्लस्टरसह विविध विषयांवर चर्चा**

जिल्ह्यातील विकासकामांचा आढावा घेत मुनगंटीवार यांनी डॉ. जाधव यांच्याशी गूळ क्लस्टर, औद्योगिक क्लस्टर, पर्यटन विकास आदींबाबतही चर्चा केली. कोल्हापूरची राज्यात स्वतंत्र ओळख आहे. यामुळे कोल्हापूरचा विकास करण्यासाठी राज्य शासन पाठीशी राहील, असेही

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : राज्याचे अर्थ व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सोमवारी दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी डॉ. जाधव यांनी मुनगंटीवार यांचा सत्कार केला. याप्रसंगी उपस्थित शाहू महाराज, महसूलमंत्री चंद्रकांत पाटील, दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, पोलिस अधीक्षक संजय मोहिते. (छाया : पप्पू अत्तार)

मुनगंटीवार यांनी यावेळी सांगितले. यासह कोल्हापुरात विविध उपक्रम, संशोधन केंद्र आदी उभारणीबाबतही विचार असल्याचे सांगत त्याबाबत डॉ. जाधव यांच्याशी सविस्तर चर्चा केली. यावेळी मुनगंटीवार यांनी जिल्ह्यातील राजकीय तसेच कायदा सुव्यवस्थेबाबतही डॉ. जाधव तसेच उपस्थित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

डॉ. जाधव यांच्या हस्ते चांदीची श्री गणेशाची मूर्ती, शाल, श्रीफळ, कोल्हापुरी फेटा देऊन मुनगंटीवार यांचा सत्कार करण्यात आला. सुमारे तासभर मुनगंटीवार आणि डॉ. जाधव यांच्यात विविध विषयांवर चर्चा रंगली होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 AUG 2017
महाराष्ट्र टाईम्स

# युवा महोत्सव १४ सप्टेंबरपासून



म. टा. वृत्तसेवा, आजरा

शिवाजी विद्यापीठाच्या ३७ व्या द्विस्तरीय युवा महोत्सव आयोजनाचे नियोजन जाहीर झाले आहे. यावर्षीच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सव १४, १६ आणि १८ सप्टेंबर ला होणार आहेत. तर मध्यवर्ती युवा महोत्सव २५, २६ आणि २७ सप्टेंबरला आयोजित केला असल्याचे पत्रक महाविद्यालयांना विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळामार्फत पाठविण्यात आले आहे. त्यादृष्टीने युवाजन अभिनय, नृत्य, गीत-संगीत आदी विविध कला-प्रकारांच्या तयारीमध्ये मग्न झाले आहेत.

**मध्यवर्ती महोत्सव २५ ते २७ ला गारगोटी येथे**

यावर्षी सातारा जिल्ह्याचा विभागीय युवा महोत्सव १४ सप्टेंबरला मुधोजी महाविद्यालय, फलटण येथे, १६ ला सांगली जिल्ह्याचा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस येथे तर जिल्ह्यात युवा महोत्सव १८ सप्टेंबरला माडखोलकर महाविद्यालय, चंदगड येथे होणार आहेत. तर मध्यवर्ती युवा महोत्सव कर्मवीर हिरे कला, शास्त्र, वाणिज्य व शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी (जि. कोल्हापूर) येथे २५ ते २७ सप्टेंबर दरम्यान होणार आहे. या युवा महोत्सवामध्ये जिल्हास्तरावर सांघिक व वैयक्तिक स्वरूपाच्या १२ कला प्रकारात स्पर्धा होईल. यामध्ये एकांकिका, लघुनाटिका, मुकनाट्य, पथनाट्य, लोकनृत्य, लोककला, लोकसंगीत वाद्यवृंद, समूहगीत, वादविवाद व प्रश्नमंजुषा या सांघिक तर सुगम गायन व वक्तृत्व या वैयक्तिक स्पर्धा समाविष्ट आहेत. विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धा प्रत्येक जिल्ह्याच्या महाविद्यालयावर १० सप्टेंबरला होईल.

## यशस्वी कलाकारांना १० गुण

राज्यातील इतर विद्यपीठांप्रमाणे युवा महोत्सवातील यशस्वी विद्यार्थी कलाकारांना १० अतिरिक्त गुण देण्याबाबत विद्यापीठ प्रशासन विचार करीत आहे. यासाठी आवश्यक प्रक्रियेनंतर असा प्रस्ताव राज्यपालांकडे पाठविला जाणार आहे. तेथील मंजुरीनंतर हे गुणदान विद्यार्थ्यांना होण्याची शक्यता आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 2 AUG 2017
Times of India

# SUK receives 103 research proposals

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has received as many as 103 proposals for the college teachers research grant this year.

Thescheme for college teachers, was introduced last year for seeding a culture of research among college teachers. The scheme had received a meagre response in its first year with merely 40 proposals received.

"The increased number of proposals is inspiring for us, as it shows that faculties are coming out of their shell and want to apply their minds to various academic research," said a university official.

D T Shirke, pro-vice-chancellor of SUK also said that the increase in the number of proposals is a good sign for the university. The university has also introduced a similar research drive for students so that the increase in the number of teachers interested in research, might directly interest students in research as well.

Earlier, a July 14 circular from SUK registrar Vilas Nandavadekar said that the university authorities have sanctioned Rs 25,000 under the scheme to college teachers, whose colleges are not receiving the assistance of University Grants Commission (UGC). He added that applications were invited from college teachers who desired to avail the grant's facility.

A teaching faculty from a city based college said that such schemes are the need of the hour, so as to make sure the academic side of the faculty remains fertile.

"There are many topics which are still unexplored of or even unheard of. We need to make sure that simple unavailability of funds does not affect the outcome of the research," said the faculty. Sattappa Mohite, a city based education activist, said that rise in the number of proposals for research will be directly beneficial to students.

2 2 AUG 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रंथालयाच्या उन्नतीसाठी संघटित प्रयत्नांची गरज

प्रतिनिधी
कोल्हापूर

ग्रंथपाल हा शिक्षकांचा शिक्षक असतो. शैक्षणिक संस्थेत ग्रंथालयास अनन्य साधारण महत्व आहे. त्यापुढेही ग्रंथालयांच्या प्रश्नाकडेही लक्ष द्यावे. ग्रंथालयाच्या अन्नतीसाठी संघटीतपणे प्रयत्न करण्याची गरज, असे मत शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र माजी विभागप्रमुख डॉ. एन. आय. दिवटणकर यांनी व्यक्त केले.

न्यू कॉलेजमध्ये भारतीय ग्रंथालयाचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी व सेवानिवृत्त ग्रंथपालां सत्कार कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे होते. याप्रसंगी विद्यार्थी व ग्रंथपालांचा सत्कार करण्यात आला.

दिवटणकर म्हणाले, ग्रंथालयासमोर विविध प्रकारची आव्हाने आहेत. संगणक माहितीसंप्रेषण तंत्रज्ञान आणि संशोधनाकडे ग्रंथपालांनी विशेष लक्ष देण्याची गरज आहे. प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे म्हणाले, वाचकांना ग्रंथालयाकडे आकृष्ट करण्यासाठी ग्रंथालयांनी टी. व्ही. आणि सोशल मिडीयाच्या आहारी गेलेल्या वाचकांना पुन्हा ग्रंथालयाकडे वळवण्याची गरज आहे. शिवाजी विद्यापीठ ग्रंथपाल नमिता खोत, डॉ. शालिनी लिहितकर, प्रा. रा. रा. मासुले, डी. एस. ए. एन. इनामदार यांनी मनोगत व्यक्त केले.

**डॉ. एन. आय. दिवटणकय यांचे मत**

डॉ. आर. पी. आडाव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. बालाजी कांबळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. बी. एस. पडळकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. प्रशांत कल्लोळी, प्रा. नायकवडी यांनी वेबसाईटचे प्रेझेंटेशन केले.



प्रा. शिवाजी कांबळे यांनी सुत्रसंचालन केले. डॉ. पांडूरंग पाटील यांनी आभार मानले. यावेळी ग्रंथपाल पी. सी. पाटील, संभाजी मोरे, प्रा. रा. रा. मासुले, अनिल पाटील आदींचा सत्कार करण्यात आला. यावेळी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ग्रंथपाल उपस्थित होते.